# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १५४-२२ दिनांक :- ३०/०५/२०२२

## मुलीच्याच घरी चोरी करणा-यांना जेरबंद करुन गुन्हयातील एकुण ४,१०,०००/-रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०७/०३/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा. ते दि. २३/०३/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. चे सुमारास कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे रुम नं ३०१, बिल्डींग नं १५, रश्मी पिंक सिटी, पेस नं ०२, नायगाव पु., ता. वसई, जि. पालघर येथील घरामध्ये प्रवेश करुन घरातील एकुण ४,८५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने चोरी करुन नेलेबाबत अज्ञात चोरटयाविरुध्द वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३५१/२०२२ कलम ३८० भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी फिर्यादी यांच्या घरातील नातेवाईक व शेजारी राहणा-या व्यक्तींकडे चौकशी केली असता चौकशीत फिर्यादीच्या सुनेची आई यांचे फिर्यादी यांचे घरी सतत येणे जाणे असुन ती मागील एका खुनाच्या गुन्हयात ०३ वर्षे कारागृहामध्ये असल्याची माहिती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने सदर महिलेस गुन्हे प्रकटीकरण पथकाने महिला पोलीसांच्या मदतीने तिच्या राहत्या घरामधुन चौकशी करीता ताब्यात घेवुन तिच्याकडे सखोल चौकशी केली असता ताब्यात घेतलेली महिला आरोपी हीने तिच्या ओळखीचा मित्र नामे कृष्णा नाथा राठोड रा. लोणावळा जि. पुणे असे मिळुन दोघांनी आपसात संगनमत करुन सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने सदर महिलेस दिनांक २१/०५/२०२२ रोजी व तिचा मित्र नामे कृष्णा राठोड यास २७/०५/२०२२ रोजी अटक करुन त्यांच्याकडुन गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिणे असा एकुण रुपये ४,१०,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन गुन्हा उघडकिस आला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, वालीव पोलीस ठाणे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोउनिरी/गजानन जिंकलवाड, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, राजेंद्र फड पोना./सचिन दोरकर,सतिष गांगुर्डे, मपोना/प्रिया राणे, पोशि/गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, मपोशि/गायकवाड यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

------ooooo------